सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

# कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग,मुंबई. ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२**

Website:-www.doa.maharashtra.gov.in Email:-dirdoa.mum-mah@gov.in/directorateofart@gmail.com


दिनांकः- १५ सप्टेंबर, २०२३

## प्रसिध्दीपत्रक

**शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता प्रथम वर्ष प्रमाणपत्र / पदविका अभ्यासक्रम रिक्त जागांसाठी प्रवेश प्रक्रिया**

------

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता १ वर्ष, २ वर्ष व ४ वर्ष कालावधीच्या प्रमाणपत्र / पदविका अभ्यासक्रमांसाठी शासकीय, शासनमान्य अनुदानित, विनाअनुदानित व कायम विना अनुदानित कला संस्थांमध्ये प्रवेश प्रक्रिया " दिनांक ९ जून, २०२३ ते १० जुलै, २०२३ तसेच दिनांक ७ ऑगस्ट, २०२३ ते ३० ऑगस्ट, २०२३" या कालावधित संचालनालयाच्या स्तरावरुन ऑनलाईन पध्दतीने व संस्था स्तरावरुन ऑफलाईन पध्दतीने राबविण्यात आली.

तथापि, ज्या संस्थांसाठी शासकीय उच्चकला परीक्षा २०२३ पुनश्च घेण्यात आली अशा संस्थांची मागणी तसेच संस्थेतील रिक्त जागा व विद्यार्थी हित लक्षात घेता, एक खास बाब म्हणून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता १ वर्ष, २ वर्ष व ४ वर्ष कालावधीच्या प्रमाणपत्र / पदविका अभ्यासक्रमांसाठी (आर्ट मास्टर अभ्यासक्रम वगळून) शासकीय, शासनमान्य अनुदानित, विनाअनुदानित व कायम विना अनुदानित कला संस्थांमध्ये प्रवेश प्रक्रिया **" दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ ते २१ सप्टेंबर, २०२३"** या कालावधित खालीलप्रमाणे राबविण्यात येत आहे.

ऑनलाईन/ संस्था स्तरावरुन ऑफलाईन प्रवेश प्रक्रियेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश झाल्यानंतरही जागा रिक्त असल्यास सदर जागांसाठी प्रवेश घेण्याकरीता विद्यार्थ्यांनी मुळ कागदपत्रांसह दिनांक **" दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ ते २१ सप्टेंबर, २०२३"** या कालावधित संबंधित कला संस्थेत उपस्थित राहावे..

ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रवेश प्रक्रियेकरीता ऑनलाईन रजिस्ट्रेशन केलेले नाही अशा विद्यार्थ्यांनी http://doaonline.co.in/fineart२३ या लिंकवर जाऊन New Application वरुन विहित कालावधीत ऑनलाईन रजिस्ट्रेशन करावे. तसेच रजिस्ट्रेशन केलेल्या आवेदन पत्राची प्रत व मुळ कागदपत्रांसह संबंधित संस्थेत प्रवेशासाठी वरील कालावधीत उपस्थित राहावे. विद्यार्थ्यांनी संबंधित संस्थांकडून दिलेल्या सूचनांचे /आदेशांचे पालन करावे.

संबंधित कला संस्थांनी रिक्त जागांवर शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन गुणवत्तेनुसार http://doaonline.co.in/fineart२३ या लिंकवर जाऊन College login वरुन विहित कालावधीत ऑनलाईन नोंदी करुन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. ज्या संस्था उक्त कालावधीत विहित पध्दतीने संस्थेत प्रवेश प्रक्रिया राबविणार नाहीत, त्यांचे प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाहीत, याची सर्व प्राचार्य व कला संस्थांनी नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | - | सही/- |
| ( संदीप डोंगरे ) | | ( राजीव मिश्रा ) |
| प्र.निरीक्षक, | | कला संचालक, |
| चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई | | कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई |